**नियमित दिवाणी दावा क्र.५७/२०२४**

**पॉवर ऑफ ॲटर्नी जाहिद मोहम्मद बिजले**
**यांच्यामार्फत अमिना अहमदखान सरनाईक व २**
**वि.**
**अल्ली मोहम्मद बिजले व २**

**नि.९, ११ व १३ खालील आदेश**

प्रस्तुतचे अर्ज प्रतिवादी क्र.१ अल्ली महंमद बिजले दि.२२.०८.२०२४ रोजी मयत असून मयताचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दोन महिने उशीर झाला असून तो उशीर व अबेटमेंट आदेश रद्द करून मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केले आहेत.

२. त्यांचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.१ हे दि.२२.०८.२०२४ मयत झाले आहेत तेव्हापासून दि.२२.११.२०२४ पर्यंत ९० दिवसांचे मुदतीत वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे होते. परंतु दि.२२.११.२०२४ पासून दि.२२.०१.२०२५ पर्यंत वादी क्र.२ हे कावीळ अजाराने आजारी असल्याने त्यांना वकीलांना भेटून माहीती देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. त्यामुळे झालेला विलंब माफ करून अबेटमेंट आदेश रद्द करावा व मयत प्रतिवादी क्र.१ यांचे नावासमोर 'पैगंबरवासी' असा शब्द घालून प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.२ तर्फे या अर्जांवर म्हणणे दाखल केले असून अर्जातील कारण योग्य नसून मयताचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी तीन महिन्यापेक्षा जास्त विलंब झाला आहे म्हणून प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा असे कथन केले. मयत प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना नोटीस नि.२० ते २३ पाठवली असता मुखत्यार नुर अल्ली बिजले नि.२४ अन्वये हजर होवून नि.२५ कडे म्हणणे दाखल केले की, ते

मयत प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर वारस असून झालेल्या विलंबाबाबत खर्च आकारून वादीस दावा दुरूस्ती करण्याबाबत आदेश व्हावेत.

**४.** वादी व प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञांचा मयत प्रतिवादी क्र.१ तर्फे वारसांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** येण प्रमाणे अर्ज व नि.१९/१ सोबत दाखल केलेला मृत्यू दाखला पाहता दि.२२.०८.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ अल्ली मोहम्मद बिजले मयत झाले असून वादीने दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा जाहीर ठरवून मिळावा व दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करू नये म्हणून निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र.१, २ व ३ यांनी कैफियत दाखल केलेली आहे. नि.७ व ८ प्रमाणे मुळ प्रतिवादींना दाव्याचे समन्स बजावून देखील ते या कामी हजर राहिले नाहीत. म्हणून दि.२०.०८.२०२४ रोजी नि.१ वरील आदेशाने दावा एकतर्फा चालविण्यात आला आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश २२ नियम ४(४) प्रमाणे अभिलेखावर घेतले किंवा न घेतले गेल्यास वादीच्या मागणीमध्ये कोणताही फरक पडताना दिसून येत नाही. केवळ आवश्यक त्या पक्षकार या तत्वाची बाधा राहू नये म्हणून मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करून अबेटमेंट आदेश रद्द करणे विधीसंगत वाटते व मयताचे वारस अभिलेखावर घेवून दाव्याच्या सरनाम्यात तशी दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येते. मयत प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी खदिजा अल्ली बिजले यांनी दि.प्र.सं.आदेश १ नियम १० (२) प्रमाणे दाव्यात आवश्यक ते पक्षकार म्हणून समाविष्ट करून घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. मुळ वादीने जरी मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या पत्नीचे नाव नि.९, ११ व १३ कडील अर्जात नमुद केले नसले तरी नि.१९/४ कडील मौजे कालुस्ते खु., ता.चिपळूण येथील गट क्र.८१८ चा फेरफार क्र.९६२ पाहता मयत प्रतिवादी

क्र.१ अल्ली मोहम्म्द बिजले यांना पत्नी खदिजा, मुलगा नुर, अस्लम व मुलगी आयशा असे वारस नोंद आहेत. त्यामुळे या अर्जातील मुले नुर, अस्लम व आयशा यांच्या सोबत मयत प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी खदिजा हिचे सुध्दा नाव दाव्याच्या सरनाम्यात समाविष्ट करणे विधी संगत वाटते. म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

**१.** वादीचा नि.९,११ व १३ कडील अर्ज रक्कम रु.५००/– मात्रच्या खर्चावर मंजुर करण्यात येतो. सदरचा खर्च वादीने खदिजा अल्ली बिजले यांना द्यावा.

**२.** त्यानंतर मयत प्रतिवादी क्र.१ नुर मोहम्मद बिजले यांचे वारस पत्नी खदिजा, मुलगा नुर, अस्लम व मुलगी आयशा असे अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करुन अबेटमेंट आदेश रद्द करण्यात येतो. तसेच मयताचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

**३.** वादीने प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसाचे आत करून दुरूस्त प्रत हजर करावी.

सही/–

(वाय.सी. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चिपळूण.

ठिकाण – चिपळूण.
दिनांक – १५/०६/२०२६.

## **- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी. |
| आदेश घोषीत दिनांक | १५.०६.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १५.०६.२०२६ |
| आदेश अपलोड केलेले दिनांक | १५.०६.२०२६ |